# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

**आस्थापना विभाग**


**एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली - ४४२६०५**

**फोन नंबर ०७१३२-२२३१०४**


जावक क्रमांक : गों.वि./आस्था/माहिती/ 969 /२०१६ — दिनांक २० /०१/२०१६

## परिपत्रक

विषय - केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत सन २०१५ चा (१ जानेवारी, २०१५ ते ३१ डिसेंबर २०१५) दहावा वार्षीक अहवाल सादर करणेबाबत.

संदर्भ :- १) मा. उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे कार्यालयीन पत्र क्र. माअअ २०१५/प्र.क्र. २४८-१५/आस्था-२, दि. ३०/१२/२०१५ (प्राप्त दिनांक १३/०१/२०१६)

२) मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर यांचे कार्यालयनी पत्र क्र. उशिनाग/स्टेनो/मा.अ./वार्षिक अहवाल/१५५/१५ दि. ०८/०१/२०१६

उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने संलग्नित महाविद्यालयातील मा. प्राचार्य यांना कळविण्यात येते की, विद्यापीठास संदर्भीय पत्र प्राप्त झाले असून सदर पत्रात नमुद केल्याप्रमाणे आपल्या महाविद्यालयाशी संबधीत माहिती संलग्नित विवरणपत्रामध्ये भरुन व माहिती बरोबर असल्याचे प्रकरणपत्रासह अहवाल शासनास विहित मुदतीत सादर करण्यात यावे. तसेच त्याची प्रत मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे, मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर व विद्यापीठास तात्काळ देण्यात यावी .

करीता माहितीस्तव व कार्यवाहीस्तव सादर.

(डॉ. विनायक ईरपाते)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सहपत्र- संदर्भीय पत्र

प्रतिलिपी :-

१) सर्व संलग्नित महाविद्यालय

E:\Right of information act under matter 2016\RTI-201/11

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. ...... दि. ..........
जावक क्र. 241 दि. 15/01/16

महाराष्ट्र शासन
सहसंचालक उच्च शिक्षण, नागपूर विभाग,
जुने मॉरिस कॉलेज इमारत, नागपूर.
Website:www.dirhe.in/jdnagpur/
Email :jdhengp@rediffmail.com
Phone No.2561713 Fax No.2554210

क्रमांक :- उशिनाग/स्टेनो/मा.अ./वार्षिक अहवाल/९५५ /१५
दिनांक : — ०८/०१/२०१६

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आस्थापना विभाग
आवक क्र. 149 दि. 15/01/2016
जावक क्र. ........ दि. ........

प्रति,

प्रति,
कुलसचिव,
**रा. तु.महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर/गोंडवाना विद्यापीठ, गडचिराली/कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक जि.नागपूर.**

**विषय- केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत सन २०१५ चा (१ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०१५ चा ) दहावा वार्षिक अहवाल सादर करणेबाबत.**

**संदर्भः-** उपसचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, ४३१(विस्तार), ४ चा मजला, मंत्रालय, मुंबई३२ यांचे पत्र क्र.माअअ-२०१५/प्र.क्र.२४८-१५/आस्था-२, दि.३०.१२.२०१५

उपरोक्त संदर्भाकिंत विषयाचे अनुषंगाने शासनाच सर्व संचालक, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य व सर्व अकृषिक विद्यापीठांचे कुलगुरु, महाराष्ट्र राज्य यांना उद्देशून लिहिलेल्या संदर्भीय पत्राचे कृपया अवलोकन करावे. सूलभ संदर्भाकरिता शासन पत्रासह सोबत आपले माहिती व कार्यवाहीस्तव संलग्न करण्यात येत आहे. **सदर पत्रात नमूद केल्याप्रमाणे आपल्या विद्यापीठाची विवरणपत्र १, २, २-अ, २-ब मध्ये भरुन सादर कराव त. तसेच आयोगाने शास्तीबाबत शिस्तभंगाच्या कारवाईबाबत प्रकरणांबाबतच्या कार्यवाहीचा अहवाल सोबत जोडलेल्या विवरणपत्र अ-अ, ३-ब मध्ये सादर करावी तसेच ३-क मध्ये माहिती मागविणा-या अर्जदारांची एकूण संख्या द्यावी, नावांची यादी सादर करुनये व माहिती बरोबर असल्याचे प्रकरणपत्रासह अहवाल शासनास विहित मुदतीत सादर करण्यात येऊन त्याची प्रत शिक्षण संचालनालय, म. रा. पुणे व या कार्यालयास देण्यात यावी ही विनंती.**

**तसेच आपले विद्यापीठांतर्गत येणा-या खाजगी अनुदानित व विना अनुदानित महाविद्यालयांची माहिती सोबतच्या विवरणपत्रात स्वतंत्रपणे सादर करावी.**

**सहपत्र -** वरील प्रमाणे

A.M.Rahatgaonkar
(डॉ.अंजली रहाटगांवकर)
सहसंचालक उच्च शिक्षण,
नागपूर विभाग,नागपूर.

**प्रत** — १.उपसचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, ४३१(विस्तार), ४ चा मजला, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सादर.
२.मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, म. रा. पुणे-१ यांना संदर्भीय पत्राचे अनुषंगाने माहितीस्तव सविनय सादर.

महाराष्ट्र शासन

क्रमांक : माअअ-२०१५/प्र.क्र.२४८-१५/आस्था-२
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा रोड,
४३१ (विस्तार),४ था मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
E-mail-htedest२@gmail.com,
दूरध्वनी क्र.०२२ २२८५५७६६
दिनांक : ३०.१२.२०१५

प्रति,

- सर्व संचालक, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य.
- सर्व अकृषिक विद्यापीठांचे कुलगुरु, महाराष्ट्र राज्य,

विषय : केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत सन २०१५ चा ( १ जानेवारी ते ३१ डिसेंबर, २०१५ ) दहावा वार्षिक अहवाल सादर करणेबाबत...

महोदय / महोदया,

राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई यांचे दिनांक १६.१२.२०१५ चे पत्र यासोबत जोडले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २५ अंतर्गत, महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाचा वार्षिक अहवाल दरवर्षी विधान मंडळास सादर करण्यात येतो. आयोगाचा सन २०१५ चा ( १ जानेवारी, २०१५ ते ३१ डिसेंबर, २०१५ ) दहावा वार्षिक अहवाल सन २०१६ मध्ये होणा-या विधानमंडळाच्या पहिल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सादर करावयाचा आहे.

अ) विवरणपत्र १, २,२-ब व ३ सोबत जोडली आहेत. सदर विवरणपत्रात माहिती भरुन सादर करावीत. तसेच आयोगाने दिलेल्या शास्तीबाबत व शिस्तीभंगाच्या कारवाईबाबतच्या प्रकरणांबाबतच्या कार्यवाहीचा अहवाल सोबत जोडलेल्या विवरणपत्र ३-अ, ३-ब मध्ये सादर करावी. तसेच ३-क मध्ये माहिती मागविणा-या अर्जदारांची एकूण संख्या द्यावी.नावांची यादी सादर करु नये. माहिती बरोबर असल्याचे प्रमाणपत्र सादर करावे. सदर माहिती सादर करतांना उपरोल्लेखित अधिनियमातील तरतूदींचे काटेकोरपणे पालन करावे.

माहिती सादर करताना गतवर्षी शासनाकडे सादर केलेल्या माहितीशी ताडून, अचूक माहिती सादर करण्यात यावी. तसेच माहितीचे संकलन करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव व कार्यालयीन दूरध्वनीही नमूद करण्यात यावा.

ब) संचालनालयानी त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या खाजगी अनुदानित आणि विना अनुदानित शिक्षण संस्थांची माहिती सोबतच्या विवरणपत्रात स्वतंत्रपणे सादर करावी.

सदर माहिती सादर करणे ही सांविधानिक जबाबदारी असल्याने, ती विहित नमुन्यात, दिनांक ८.१.२०१६ पूर्वी निश्चितपणे शासनास सादर करावी, ही विनंती.

आपला,

(पां.म.ताकटे)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

%

श्री ढोबळे / श्री दिक्षित
A.Concern
सर्व विद्यापीठे व आधिपत्याखाली असलेली महाविद्यालये यांना circulate करावी
06.01.2016.

२९०३/उशि-२
३०/१२/१५


सूचना का अधिकार

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, मुख्यालय
१३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चोक,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.
website : sic.maharashtra.gov.in

दूरध्वनी क्र. ०२२-२२०४९१८४ फॅक्स क्र.०२२-२२०४९३१०


क्रमांक : मुमाआ-२०१५/वार्षिक अहवाल/प्र.क्र. १३०/०२ (I) दिनांक :१६/१२/२०१५.

23 DEC 2015

प्रति,

अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग
कार्यासन उशि-२ (9607)
दिनांक 23/12/15 23/12/15
आवक क्र.

**विषय :** केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत सन २०१५ (१ जानेवारी ते ३१ डिसेंबर, २०१५) चा दहावा वार्षिक अहवाल तयार करणेबाबत-

महोदय/महोदया,

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २५ अंतर्गत महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाचा वार्षिक अहवाल दरवर्षी विधानमंडळात सादर करण्यात येतो. आयोगाचा सन २०१५ चा (दिनांक १ जानेवारी २०१५ ते ३१ डिसेंबर, २०१५) दहावा वार्षिक अहवाल सन २०१६ मध्ये होणाऱ्या विधानमंडळाच्या पहिल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सादर करावयाचा आहे.

२. महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाचा सन २०१४ चा नववा वार्षिक अहवाल राज्य विधान मंडळाच्या सन २०१५ च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात दोन्ही सभागृहांसमोर राज्य शासनामार्फत सादर करण्यात आला होता. त्याची प्रत आयोगाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. मंत्रालयीन विभागांकडून प्राप्त होणारे अहवाल विहीत वेळेत प्राप्त होत नसल्याने तसेच प्राप्त होणारे अहवालदेखील परिपूर्ण नसून त्यामध्ये वारंवार निदर्शनास आणून दिलेल्या त्रुटीही पुन्हा पुन्हा आढळून येत असल्याने त्या त्रुटींचे निराकरण करुन आयोगाचा अहवाल शासनामार्फत विधानमंडळाच्या पहिल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सादर करणे शक्य होत नाही. ही वस्तुस्थिती विचारात घेता सन २०१५ च्या अहवालासाठी आपल्या विभागाची एकत्रित माहिती पाठविताना अशा प्रकारे त्रुटी राहणार नाहीत याची दक्षता घेण्याच्या सूचना सर्व संबधीतांना देण्यात याव्यात.

३. सर्व मंत्रालयीन विभागांकडून विवरण पत्रे कमांक (विवरणपत्र १, २, २-अ, ब, क, ड, ई, ३, ३-अ, ब, क) मध्ये एकत्रित माहिती विहीत कालावधीत प्राप्त होणे आवश्यक आहे. विवरणपत्र क्रमांक २-ड ची माहिती ही फक्त नगर विकास विभागाशी संबधीत असल्याने त्या विभागाने उपरोक्त सर्व विवरणपत्रांच्या माहितीखेरीज विवरणपत्र क्रमांक २-ड ची माहिती देखील पाठवावयाची आहे. तसेच सर्व विभागांनी सदर विवरणपत्रांत मागील वर्षाची प्रलंबित आकडेवारी दर्शवितांना त्यांनी सन २०१४ च्या अहवालात नमूद केलेली वर्षाअखेरील प्रलंबित आकडेवारी दर्शवावयाची असून यामध्ये तफावत नसल्याची खातरजमा करुनच परीपूर्ण अहवाल आयोगास सादर करावयाचा आहे. मागील अहवाल तयार करतांना काही विभागांकडून याबाबत खबरदारी घेतली गेलेली नव्हती. तसेच विभागांकडे आलेले व निकाली काढलेले माहिती अर्ज/प्रथम अपीले व तक्रारी

यांचा ताळमेळ न घातल्याने आयोगास सादर करण्यात आलेल्या अहवालामध्ये मोठ्या प्रमाणात त्रुटी आढळून आल्या आहेत व त्यांचे निराकरण करण्यासाठी संबधित विभागांशी संपर्क साधून सुधारीत अहवाल प्राप्त करुन घेण्यासाठी मोठया प्रमाणात कालापव्यय झालेला आहे याबाबत पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

४. (i) विवरणपत्र क्रमांक २ मध्ये विवरणपत्र क्र. २-अ ते २-ई मधील माहितीचा एकत्रित गोषवारा असल्याने ते तयार करताना प्रत्येक मंत्रालयीन विभागाने त्यामध्ये विवरणपत्र २-अ ते २-ई मधील अचूक माहिती समाविष्ट करण्याची व त्यांची एकत्रित आकडेवारी ही विवरणपत्र क्र. २ मध्ये दर्शविण्याची दक्षता घेण्यात यावी. तसेच आयोगाचा अहवाल परिपूर्ण असण्याच्या दृष्टीने आपल्या अधिपत्याखालील कार्यालयांची संचालनालय/ आयुक्तालयनिहाय; जिल्हानिहाय; महानगरपालिका-निहाय तसेच महामंडळनिहाय माहिती पाठविताना आयोगाच्या मागील वर्षांच्या अहवालातील क्रमानुसारच पाठविण्यात यावी. तसेच ज्या ठिकाणी एकूण संख्येची आवश्यकता आहे त्याठिकाणी भरण्यात येणारी आकडेवारी अचूक आहे याबाबत खातरजमा करण्यात यावी.

(ii) वरील विवरणपत्रांपैकी विवरणपत्र क्रमांक-२ क ची माहिती पाठवितांना सन २०१४ च्या आयोगाच्या वार्षिक अहवालातील विवरणपत्र क्रमांक २ क मध्ये ज्या क्रमाने जिल्हे दर्शविलेले आहेत त्याच क्रमाने आपली जिल्हानिहाय माहिती तयार करण्यात यावी. (यासाठी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेला अहवाल कृ. पहावा.) त्यामध्ये स्तंभनिहाय एकूण संख्या देखील नमूद करणे आवश्यक आहे, जेणेकरुन माहिती तयार करतांनाच आकडेवारीमध्ये त्रुटी राहणार नाही.

(iii) विविध मंत्रालयीन विभागांनी पाठविलेल्या माहितीचा एकत्रित गोषवारा वार्षिक अहवालासाठी तयार करणे आयोगास सुलभ व्हावे यासाठी सर्व विवरणपत्रांची माहिती सॉफ्ट कॉपी पेन ड्राईव्ह/सीडी मार्फत आयोगास पाठविण्यात यावी.

(iv) माहितीच्या अधिकारात अर्ज करुन माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी दारिद्य रेषेखालील किती नागरिकांनी लाभ घेतला आहे त्याबद्दलची आकडेवारी विवरण पत्र क्र. २ मधील (शेवटच्या) रकाना क्र. ११ मध्ये न चूकता दर्शविण्यात यावी सदर माहिती निरंक असल्यास त्याप्रमाणे उल्लेख करण्यात यावा.

५. आयोगास माहिती भरुन सादर करावयाची विवरणपत्रे यासोबत जोडण्यात आली असून त्यामध्ये वरील सूचना विचारात घेऊन व अचूक माहिती भरून दि. ३१.०१.२०१६ पर्यंत आयोगास सादर करण्यात यावी तसेच सदर माहिती पाठविताना सोबत जोडलेल्या नमून्यातील विभागप्रमुखांच्या स्वाक्षरीच्या प्रमाणपत्रासह आयोगास माहिती पाठविण्याची व्यवस्था करावी.

आपला,

(भ. बु. गावडे)
सचिव, राज्य माहिती आयोग

**सहपत्र** : वरीलप्रमाणे

प्रत, संग्रहार्थ.

G:\Mrudula\८ Annual report\१० th Annual Report\Praposal-note & Letter-१.doc

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २५ अन्वये सन २०१५ चा दहावा वार्षिक अहवाल तयार करण्यासाठी महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाला उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीमध्ये विभागाची व विभागांतर्गत येणा-या सर्व कार्यालयांची सन २०१५ मधील १ जानेवारी ते ३१ डिसेंबर या कालावधीची एकत्र माहिती समाविष्ट करण्यात आली असून ती बरोबर आहे.

( )

~~अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,~~

~~..............................विभाग,~~

~~मंत्रालय, मुंबई ४०००३२.~~

संचालक / कुलसचिव

दिनांक :

(पत्र क्र. मुमाआ-२०१५/वार्षिक अहवाल/प्र.क्र.१३०/०२, दि.१६ /१२/२०१५ चे सहपत्र)

## विवरणपत्र क्रमांक १

महितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंमलबजावणीकरिता महाराष्ट्र राज्यामध्ये सन २०१५ मध्ये पदनिर्देशित करण्यात आलेल्या सहायक जन माहिती अधिकारी, जन माहिती अधिकारी, व अपिलीय अधिकारी यांची मंत्रालय विभागनिहाय तसेच महाराष्ट्र राज्य माहिती आयोग व महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाची माहिती

| अ. क्र. | विभागाचे नाव | सहायक जन माहिती अधिकारी | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | |
| एकूण | | | | |

## विवरणपत्र क्रमांक २

जानेवारी २०१५ ते डिसेंबर २०१५ या कालावधीत महाराष्ट्र राज्यामध्ये प्राप्त झालेल्या माहिती अर्जांचा एकत्रित गोषवारा

| अ. क्र. | विभागाचे नाव | डिसेंबर २०१४ अखेरीस प्रलंबित माहिती अर्जांची सुधारित संख्या | २०१५ या वर्षी प्राप्त झालेल्या माहिती अर्जांची संख्या | एकूण माहिती अर्ज (रकाना क्र. ३+४) | २०१५ या वर्षी निकाली काढलेल्या माहिती अर्जांची संख्या | निकाली काढलेल्या माहिती अर्जांपैकी (रकाना ६ ची फोड) | | २०१५ या वर्षी अखेरीस प्रलंबित माहिती अर्जांची संख्या (रकाना क्र. ५-६) | २०१५ या वर्षी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीपोटी जमा झालेली रक्कम (रुपये) | दारिद्र्य रेषेखालील लाभ घेतलेल्या नागरिकांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहिती अर्जांची संख्या | माहिती नाकारण्यात आलेल्या माहिती अर्जांची संख्या (रकाना क्र. ६-७) | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | | | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | | | |

## विवरणपत्र क्रमांक २ अ

जानेवारी २०१५ ते डिसेंबर २०१५ या कालावधीत खुद्द मंत्रालयीन विभागात प्राप्त झालेल्या माहिती अर्जांचा तपशील दर्शविणारे विवरण पत्र

| अ. क्र. | विभागाचे नाव | डिसेंबर २०१४ अखेरीस प्रलंबित माहिती अर्जांची सुधारित संख्या | २०१५ या वर्षी प्राप्त झालेल्या माहिती अर्जांची संख्या | एकूण माहिती अर्ज (रकाना क्र.३+४) | २०१५ या वर्षी निकाली काढलेल्या माहिती अर्जांची संख्या | निकाली काढलेल्या माहिती अर्जांपैकी (रकाना ६ ची फोड) | | २०१५ या वर्ष अखेरीस प्रलंबित माहिती अर्जांची संख्या (रकाना क्र. ५-६) | अहवालाच्या कालावधीत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीपोटी जमा झालेली रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहिती अर्जांची संख्या | माहिती नाकारण्यात आलेल्या माहिती अर्जांची संख्या (रकाना क्र. ६-७) | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | | |

## विवरणपत्र क्रमांक २ ब

जानेवारी २०१५ ते डिसेंबर २०१५ या कालावधीत संचालनालय/आयुक्तालय तसेच विभागीय स्तरावरील कार्यालयात प्राप्त झालेल्या माहिती अर्जांचा तपशील दर्शविणारे विवरण पत्र

| अ. क्र. | विभागाचे नाव | डिसेंबर २०१४ अखेरीस प्रलंबित माहिती अर्जाची संख्या | २०१५ या वर्षी प्राप्त झालेल्या माहिती अर्जाची संख्या | एकूण माहिती अर्ज (रकाना क्र.३+४) | २०१५ या वर्षी निकाली काढलेल्या माहिती अर्जांची संख्या | निकाली काढलेल्या माहिती अर्जापैकी (र. क्र. ६ ची फोड) | | २०१५ या वर्ष अखेरीस प्रलंबित माहिती अर्जाची संख्या (रकाना क्र. ५-६) | अहवालाच्या कालावधीत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीपोटी जमा झालेली रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहिती अर्जाची संख्या | माहिती नाकारण्यात आलेल्या माहिती अर्जाची संख्या (रकाना क्र. ६-७) | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | | | | | | |
| | एकूण | | | | | | | | |

## विवरणपत्र क्रमांक २ क

जिल्हास्तरीय कार्यालयात प्राप्त झालेल्या अर्जांचे जिल्हावार तपशिल दर्शविणारे विवरणपत्र

(यात फक्त नगर पालिकांची माहिती अंतर्भूत असून त्या जिल्ह्यांतील महानगरपालिकांच्या माहितीचा अंतर्भाव नाही)

| अ. क्र. | विभागाचे नाव | डिसेंबर २०१४ अखेरीस प्रलंबित माहिती अर्जाची संख्या | २०१५ या वर्षी प्राप्त झालेल्या माहिती अर्जाची संख्या | एकूण माहिती अर्ज (रकाना क्र.३+४) | २०१५ या वर्षी निकाली काढलेल्या माहिती अर्जांची संख्या | निकाली काढलेल्या माहिती अर्जापैकी (रकाना ६ ची फोड) | | २०१५ या वर्ष अखेरीस प्रलंबित माहिती अर्जाची संख्या (रकाना क्र. ५-६) | अहवालाच्या कालावधीत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीपोटी जमा झालेली रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहिती अर्जाची संख्या | माहिती नाकारण्यात आलेल्या माहिती अर्जाची संख्या (रकाना क्र. ६-७) | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | | | | | | |
| | एकूण | | | | | | | | |

## विवरणपत्र क्रमांक ३

जानेवारी २०१५ ते डिसेंबर २०१५ या कालावधीत महाराष्ट्र राज्यामध्ये प्राप्त झालेल्या प्रथम अपिलांचा एकत्रित गोषवारा

| अ. क्र. | विभागाचे नाव | डिसेंबर २०१४ अखेरीस प्रलंबित प्रथम अपिलाची संख्या | सन २०१५ या वर्षी प्राप्त झालेल्या प्रथम अपिलांची संख्या | एकूण प्रथम अपील (रकाना क्र. ३+४) | सन २०१५ या वर्षी निकाली काढलेल्या प्रथम अपील अर्जांची संख्या | निकाली काढलेल्या अपिलांपैकी प्रथम अपिलांपैकी (रकाना क्र. ५-६) | | अहवालाच्या कालावधीच्या अखेरीस प्रलंबित प्रथम अपिलांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेल्या अपिलांची संख्या | नाकारण्यात आलेल्या अपिलांची संख्या (र.क्र. ६-७) | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |
| | एकूण | | | | | | | |

## विवरणपत्र क्रमांक ३-अ

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० (१) नुसार आयोगाने सुनावणीअंती पारित केलेल्या शास्तीच्या कारवाईबाबतच्या प्रकरणांची यादी

| अ. क्र. | विभागाचे नाव | अपीलकर्ता/ तक्रारदार यांचे नाव | अपील/तक्रार क्रमांक व आदेशाचा दिनांक | कलम २० (१) नुसार आयोगाने दिलेल्या शास्तीबाबत | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | शास्तीची रक्कम | शास्तीची रक्कम वसुल केली/नाही केली |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |
| एकूण | | | | | |

## विवरणपत्र क्रमांक ३-ब

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० (२) नुसार आयोगाने सुनावणीअंती पारित केलेल्या शिस्तभंगाच्या कारवाईबाबतच्या प्रकरणांची यादी

| अ. क्र. | विभागाचे नाव | अपीलकर्ता/ तक्रारदार यांचे नाव | अपील/तक्रार क्रमांक व आदेशाचा दिनांक | कलम २० (२) नुसार आयोगाने दिलेल्या शिस्तभंगाच्या कारवाईचे अनुपालन केले/नाही केले. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | |
| एकूण | | | | |

## विवरणपत्र क्रमांक ३-क

| अ. क्र. | माहिती मागविणाऱ्या अर्जदारांची संख्या | जन माहिती अधिकारी यांनी ३० दिवसांच्या आत माहिती दिलेल्या प्रकरणांची संख्या | जन माहिती अधिकारी यांनी ३० दिवसांच्या आत माहिती न दिलेल्या प्रकरणांची संख्या (रकाना क्र. २-३) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | |
| एकूण | | | |

## विवरणपत्र क्रमांक २ ड

### जानेवारी २०१५ ते डिसेंबर २०१५ या कालावधीत महानगरपालिका स्तरावर प्राप्त झालेल्या माहिती अर्जांचा तपशील दर्शविणारे विवरणपत्र

| अ. क्र. | महानगर-पालिकेचे नाव | डिसेंबर २०१४ अखेरीस प्रलंबित माहिती अर्जांची संख्या | २०१५ या वर्षी प्राप्त झालेल्या माहिती अर्जांची संख्या | एकूण माहिती अर्ज (रकाना क्र.३+४) | २०१५ या वर्षी निकाली काढलेल्या माहिती अर्जांची संख्या | निकाली काढलेल्या माहिती अर्जांपैकी (रकाना क्र.६ ची फोड) | | २०१५ या वर्ष अखेरीस प्रलंबित माहिती अर्जांची संख्या (रकाना क्र. ५-६) | अहवालाच्या कालावधीत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीपोटी जमा झालेली रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहिती अर्जांची संख्या | माहिती नाकारण्यात आलेल्या माहिती अर्जांची संख्या (रकाना क्र. ६-७) | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | | | | | | |
| | एकूण | | | | | | | | |

## विवरणपत्र क्रमांक २ ई

### जानेवारी २०१५ ते डिसेंबर २०१५ या कालावधीत महामंडळांकडे प्राप्त झालेल्या माहिती अर्जांचे विवरण पत्र

| अ. क्र. | विभागाचे नाव | डिसेंबर २०१४ अखेरीस प्रलंबित माहिती अर्जांची संख्या | २०१५ या वर्षी प्राप्त झालेल्या माहिती अर्जांची संख्या | एकूण माहिती अर्ज (रकाना क्र.३+४) | २०१५ या वर्षी निकाली काढलेल्या माहिती अर्जांची संख्या | निकाली काढलेल्या माहिती अर्जांपैकी (रकाना क्र.६ ची फोड) | | २०१५ या वर्ष अखेरीस प्रलंबित माहिती अर्जांची संख्या (रकाना क्र. ५-६) | अहवालाच्या कालावधीत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीपोटी जमा झालेली रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहिती अर्जांची संख्या | माहिती नाकारण्यात आलेल्या माहिती अर्जांची संख्या (रकाना क्र. ६-७) | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | | | | | | |
| | एकूण | | | | | | | | |